१७, डॉ. आंबेडकर मार्ग , लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं-०२०-२६१२२२१७
ई-मेल आय डी क्र- dydepune@gmail.com वेब साईट- www.dydepune.com

---

जा.क्र.उमाशि-३/११ वी ऑनलाईन/तक्रार/२०१६/ 9८०५५
दिनांक - 16 AUG 2016

प्रति,

**प्राचार्य,**
**सर्व कनिष्ठ महाविद्यालये,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र,**

**विषयः**-इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन २०१६-१७ प्रवेशाबाबत

इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. शासनाच्या आदेशाप्रमाणे विशेष फेरी अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्यामुळे त्यापूर्वी मिळालेल्या महाविद्यालयमध्ये मिळालेला प्रवेश विद्यार्थी ऑनलाईन रद्द करत आहेत. असे प्रवेश रद्द करतांना खाली सूचनांचे पालन करावे.

१) ऑनलाईन प्रवेश प्रकियेत पुर्वीचा मिळालेला प्रवेश ऑनलाईन रद्द करावा. विद्यार्थ्यांनी जर संबधित महाविद्यालयात संपूर्ण फी भरलेली असेल तर प्रवेश रद्द करतांना रु. २००/- (रु.दोनशे मात्र) शुल्क कमी करुन संपूर्ण फी विद्यार्थ्यांस परत करावी. तसेच इ. १० वी चा मूळ शाळा सोडल्याचा दाखला व मूळ गुणपत्रक विद्यार्थ्यांस त्याच वेळी देणेत यावे.

२) विशेष फेरीतील प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत महाविद्यालयाने विद्यार्थ्यांची जनरल रजिष्टर मध्ये नोंद करु नये.

३) काही महाविद्यालयांमधुन फी ही जादा आकारल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेच्या माहिती पुस्तिकेत नोंदविलेल्या फी व्यतिरिक्त अधिकचे शुल्क कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्यांकडून घेण्यात येवु नये.

उपरोक्त १ ते ३ प्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, याबाबत कार्यालयाकडे आपल्या महाविद्यालयाची तक्रार आल्यास सदर प्रकरणी प्राचार्य यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

MRaut 16.8.16
**(मिनाक्षी राऊत)**
**सहा. शिक्षण संचालक,**
**पुणे विभाग,पुणे -१**

**प्रत माहितीसाठी**
**१) मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे-१**
**२) मा. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१**